# - प्रेस नोट -

दि. २२/०६/२०२६

## बांद्रा पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. २०/०६/२०२६ रोजी १७.३० वा. च्या सुमारास फिर्यादी शेहबाज मेहबुब शेख, वय-२९ वर्षे, धंदा- डिलिव्हरी बॉय, रा. ठी. वांद्रे प, मुंबई, हे BMC मैदानाच्या समोरील रस्त्यावरती वांद्रे प, मुंबई येथे त्यांची वापरती काळया रंगाची अॅक्सीस कंपनीची मोटारसायकल मैदानाच्या बाजूला पार्क करुन थांबले होते. त्यावेळी फिर्यादीच्या ओळखीचा बाजुस राहवयास असलेला मित्र अटक आरोपी वय -२५ वर्षे, याने फिर्यादीस मोटारसायकल मागितली असता त्यास फिर्यादीने नकार दिला असता अटक आरोपीने फिर्यादीशी वाद घालुन हाताने मारहाण केली त्यामुळे फिर्यादी यांच्या नाकातुन रक्त आले. त्यानंतर फिर्यादी भाभा रुग्णालय येथे जात असताना BMC गार्डनच्या बाहेरील रोडवरती अटक आरोपी हा फिर्यादी जवळ येऊन त्याने अंगावर धावून जाऊन त्याच्या जवळील कोयत्याने जीवे ठार मारण्याच्या उद्‌देशाने फिर्यादी यांच्या डोक्यावरती वार केला असता फिर्यादी हे स्वत:ला वाचवण्याचा प्रयत्न करत असताना फिर्यादी यांच्या डाव्या हाताच्या पंज्यावरती अटक आरोपी याच्या हातातील कोयता लागला त्यामुळे डाव्या हाताच्या तीन बोटासह पंजास खोल दुखापत झाली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२१/०६/२०२६ रोजी गु.र.क्र.१२११/२६, कलम १०९, ११५(२), ३५२, ३५१(३), बीएनएस २०२३, सह कलम ३७(१)(अ), १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

----------------------